K. S. Wani Memorial Trust

# NEWS LETTER

Editorial Committee :
Prof. Dr. Shobha Shinde (Chief Editor)
Ms. Vaishali Songire (Asst. Editor) &
Prof. Mr. Prasad Puranik (Co-Editor)

Volume No.30 / July – September 2025 / K. S. Wani Memorial Trust Reg. No.E352

## Printing Institute News




### "झाडांच्या मनात जाऊ" कार्यक्रमाने श्रोते मंत्रमुग्ध

का.स. वाणी स्मृती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष स्व. डॉ. जगन्नाथ वाणी यांच्या ९१ व्या जयंतीनिमित्त विचारपुष्प वाचक मंच धुळे निर्मित 'झाडांच्या मनात जाऊ' या कार्यक्रमाचे आयोजन ९ सप्टेंबर रोजी संस्थेच्या प्रा. र. का. केले सभागृहात करण्यात आले होते. यावेळी डॉ. वाणी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रतिष्ठानचे विद्यमान अध्यक्ष सी.ए.श्री शशिकांत धामणे यांच्यासह संस्थेच्या सचिव डॉ. शोभा शिंदे व यंग फाऊंडेशनचे संस्थापक श्री. संदीप देवरे यांनी डॉ. वाणी यांच्या आठवणी सांगितल्या व त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. झाडांच्या मनाचा शोध घेणाऱ्या सुरेल कविता यावेळी सादर करण्यात आल्या, या कार्यक्रमाची संकल्पना व दिग्दर्शक अपूर्वा पाटील यांची होती. अपूर्वा पाटील यांच्यासह डॉ. सुप्रिया पाटील, अरुंधती ब्रम्हे, पुष्पा कानडे व प्रा.आरती बरीदे यांनी कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमात सादर केलेल्या झाडांच्या कवितांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. झाड जगवण ही काळाची गरज लक्षात घेऊन डॉ. वाणीं सारख्या निसर्ग प्रेमी व्यक्तिमत्वास या कार्यक्रमाद्वारे आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वैशाली सोनगिरे व आभार प्रदर्शन डॉ. दिपाली महाजन यांनी केले. कार्यक्रमास डॉ वाणी यांचे चाहते तसेच संस्थेचे विश्वस्त, विविध संस्थांचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




कार्यक्रमात सहभागी मान्यवर व कर्मचारी



### गणेशोत्सव उत्साहात साजरा

दरवर्षीप्रमाणे यंदाही संस्थेच्या औद्योगिक वसाहतीत असलेल्या शाखेत श्री गणरायांचे आगमन झाले. श्री गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. ३१ ऑगस्ट रोजी गणेशोत्सवानिमित्त श्री सत्यनारायणाची महापूजा व सायंकाळी पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी व संस्थेतील कर्मचारी बांधवांसाठी सहकुटुंब स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचा उपस्थितांनी आनंद घेतला.

## स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

१५ ऑगस्ट २०२५ रोजी भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन संस्थेत साजरा करण्यात आला यावेळी संस्थेचे विश्वस्त श्री जितेंद्र सोनगिरे यांनी ध्वजारोहण केले व राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. स्वातंत्र्य लढ्यात ज्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्या सर्व हुतात्म्यांचे स्मरण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## ‘एका लग्नाची कोर्टातील गोष्ट’ प्रेक्षकांना भावली

२५ ऑगस्ट रोजी मुंबई येथील ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती अलका पावनगडकर यांनी संस्थेच्या प्रा.र.का. केले सभागृहात संस्थेतील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी एकपात्री प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर केला या कार्यक्रमात डॉ. अलका पावनगडकर यांनी ‘एका लग्नाची कोर्टातील गोष्ट’ या कार्यक्रमाचे सादरीकरण केले. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याची गरज असून बदलत्या सामाजिक स्थितीत विवाह करताना स्त्री स्वातंत्र्य व स्त्रियांच्या भावना विचारात घेतल्या जाव्या यासाठी सत्य घटनेवर आधारित एका लग्नाची कोर्टातील गोष्ट सांगून प्रेक्षकांनी या प्रश्नावर विचार करावा असे प्रबोधन केले. संस्थेच्या सचिव डॉ. शोभा शिंदे यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.



डॉ. अलका पावनगडकर, उपस्थित विद्यार्थी व सहकारी कर्मचारी

## पोस्टर स्पर्धेसह मार्गदर्शनपर कार्यक्रम संपन्न

कै. भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय धुळे अंतर्गत जिल्हा एड्स निर्मूलन कक्ष व का. स. वाणी संस्था रेड रिबन क्लब धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवादिन साजरा करण्या आला. यावेळी पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तसेच आधार बहुउद्देशीय संस्था (विहान) धुळे या संस्थेचे समुपदेशक श्री. दुर्गेश पाचोंदे यांनी एड्स आजाराविषयी सविस्तर माहिती सांगून विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण केली. एड्स पॉझिटिव्ह रुग्णाला मानसिक आधार दयावा असे मत व्यक्त केले धुळे जिल्हा रुग्णालयाचे एड्स नियंत्रण कक्षातील समुपदेशक श्री बाबाजी पाटील यांनी देखील विद्यार्थ्यांशी संवाद साधला व पोस्टर स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला.



प्रास्ताविक करतांना प्रा. प्रसाद पुराणिक, उपस्थित मान्यवर व विद्यार्थी




## विद्यार्थ्यांची यशोगाथा

मी चेतन माधवराव पाटील राहणार जळगाव. घरची परिस्थिती बेताचीच. शेती नावापुरतीच होती. वडील क. ब. चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात ड्रायव्हर म्हणून काम करत, आणि त्यांच्या पगारावर आमचं शिक्षण व घरखर्च चालत असे .वडील दिवसरात्र कष्ट करत होते, पण त्यांचा मिळणारा मोबदला व आमचा वाढता खर्च यामुळे ताळमेळ जमत नव्हता त्यांचे कष्ट पाहून माझ्या मनात नेहमीच विचार यायचा आपण काहीतरी करून दाखवायचं.

२०१२ साली मी बारावी पास झालो, पण पुढचं काय करायचं हा मोठा प्रश्न डोळ्यासमोर उभा राहिला. उच्च शिक्षणासाठी पैसा नव्हता. खरं तर मी बारावी पर्यंतचं शिक्षण रात्री हॉस्पिटलमध्ये पार्ट टाईम नोकरी करून पूर्ण केले त्यावेळी मला फक्त ९०० रुपये पगार मिळत असे. याच काळात वडिलांचे अधिकारी, श्री. प्रकाश पाटील सर (उप.कुलसचिव, क. ब. चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ) यांनी मला प्रिंटिंग अँड पॅकेजिंग या क्षेत्राची माहिती दिली. त्यानंतर मी का. स. वाणी संस्थेच्या प्रिंटिंग कॉलेजमध्ये आलो व श्री. पुराणिक सरांना भेटलो त्यांनी अभ्यासक्रमाची माहिती दिली त्यावेळी मनात एकच विचार आला आता याच क्षेत्रात करिअर करायचे मी प्रवेश घेतला. मी डिस्टिंक्शन मिळवून शिक्षण पूर्ण केलं. माझी पहिली नोकरी म्हणजे २०१३ मध्ये कॅम्पस इंटरव्ह्यू द्वारे श्रीरामा मल्टी टेक लिमिटेड या अहमदाबाद येथील कंपनीत मशीन ऑपरेटर या पदावर निवड झाली दोन वर्षे अनुभव घेऊन मी हिमाचल प्रदेश मध्ये गेलो पण आनंदाचे दिवस जास्त काळ टिकले नाहीत. हिमाचल प्रदेशातील ‘बेट्स इंडिया पॅकेजिंग लिमिटेड’ मध्ये काम करत असताना अचानक वडिलांच्या निधनाची बातमी मिळाली. हा क्षण माझ्यासाठी आयुष्याचा सर्वांत मोठा धक्का देणारा होता. आमचे घर चालवणारा एकमेव आधार हरपला होता. आता आईवर आणि माझ्यावर सगळा भार आला. आई कोणतंही काम करून दिवस ढकलत होती. धाकट्या भावाच शिक्षणही माझ्यावर अवलंबून होतं. मी त्याचा देखील प्रवेश संस्थेत घेतला. आज तो खोपोली येथील एका नामांकित कंपनीत क्वालिटी मॅनेजर म्हणून काम करतो आहे.

मी स्वतः पुढे उच्च शिक्षण घेण्याचे ठरवले मी मणिपाल विद्यापीठातून बी.टेक. इन प्रिंटिंग अँड पॅकेजिंग हा अभ्यासक्रम पूर्ण केला त्यानंतर अजंता पॅकेजिंग, दमन येथे प्रॉडक्शन प्लॅनिंग विभागात काम केले नंतर मुंबई, पुणे येथे अनुभव घेत २०२० मध्ये मी ‘पार्कसन्स पॅकेजिंग लिमिटेड’ मध्ये सीनियर एक्झिक्युटिव्ह – सेल्स अँड मार्केटिंग या पदावर रुजू झालो. ही देश-विदेशात कार्यरत एक नामांकित कंपनी आहे. तीन वर्षांच्या कष्टानंतर कंपनीच्या उच्च व्यवस्थापनाने माझी नियुक्ती टांझानिया येथील त्यांच्या प्लांटमध्ये नॅशनल सेल्स अँड मार्केटिंग मॅनेजर म्हणून केली. आणि पहिल्यांदाच परदेशात काम करण्याची संधी मला मिळाली. आज मी टांझानिया प्लांटचा सेल्स अँड मार्केटिंग हेड म्हणून कार्यरत आहे.

जुने दिवस आठवले की अजूनही डोळे पाणावतात. आज मी जे काही आहे ते का. स. वाणी संस्थेच्या शिक्षणामुळे आणि माझ्या गुरुजनांच्या आशीर्वादामुळे. मित्रांनो, प्रिंटिंग हे एक विशाल क्षेत्र आहे. या क्षेत्रात अजूनही स्पर्धा कमी असून करिअर घडवण्याच्या प्रचंड संधी आहेत. मी संस्थेचे आभार व्यक्त करतो व डॉ. जगन्नाथ वाणी सराना मनःपूर्वक प्रणाम करून मी माझं मनोगत संपवतो धन्यवाद !





# रेऊ वाणी विज्ञान विहार

## रेऊ वाणी विज्ञान विहाराची प्रवेश परीक्षा व प्रयोग वर्ग सुरू

धुळे : का.स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित रेऊ वाणी विज्ञान विहारातर्फे 29 जून 2025 रोजी प्रवेश परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेला विविध शाळांमधील एकूण 510 विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. या परीक्षेतून निवड झालेल्या 80 विद्यार्थ्यांनी प्रयोग वर्गात प्रवेश घेतला असून त्यांच्या नियमित बॅचेस सुरू आहेत. या प्रयोग वर्गात पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विविध शाळांतील विद्यार्थी एकत्र येऊन विज्ञान विषयाचे सखोल ज्ञान प्रयोगातून आत्मसात करत आहेत.

रेऊ वाणी विज्ञान विहाराचे हे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड, जिज्ञासा आणि प्रयोगशीलता विकसित करण्यास हातभार लावत असून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगांद्वारे शिकण्याची संधी मिळत आहे.



**प्रयोग वर्गात विद्यार्थी प्रयोग करतांना**

## ‘रागावर नियंत्रण’ या विषयावर कार्यशाळा संपन्न

दिनांक 13 जुलै 2025 रोजी शाळेत पौगंडावस्थेतील विद्यार्थ्यांसाठी ‘रागावर नियंत्रण’ या विषयावर मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेला प्रमुख अतिथी म्हणून कमलाबाई शंकरलाल कन्या शाळेच्या माजी मुख्याध्यापिका सौ. मनीषा जोशी उपस्थित होत्या, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री. राजेंद्र मगर यांनी भूषविले. कार्यशाळेचे मार्गदर्शन समुपदेशक डॉ. विभा इंदानी यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, राग ही एक सामान्य मानवी भावना आहे. किशोरावस्थेत मेंदूचा विकास, हार्मोनल बदल, स्व-ओळख, वाढलेल्या जबाबदाऱ्या आणि सामाजिक दबाव यांसारख्या कारणांमुळे रागाची भावना निर्माण होऊ शकते.

डॉ. इंदानी यांनी पुढे स्पष्ट केले की, “आपला राग का निर्माण होतो हे ओळखल्यास त्यावर नियंत्रण मिळवणे सोपे होते.” राग नियंत्रित करण्यासाठी प्रतिक्रिया देण्यापूर्वी क्षणभर थांबणे, परिस्थितीचे मूल्यांकन करणे, खरोखर काय घडले आहे यावर विचार करणे आणि मूळ भावना समजून घेऊन शांतपणे व्यक्त होणे — हे राग व्यवस्थापनाचे प्रभावी तंत्र आहे, असे त्यांनी सांगितले. कार्यशाळेचा समारोप विद्यार्थ्यांच्या प्रश्नोत्तर सत्राने झाला. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना भावनांवर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्व आणि सकारात्मक संवादाचे तंत्र शिकण्याची मौल्यवान संधी मिळाली.



**कार्यशाळेत राजेंद्र मगर व डॉ. विभा इंदानी मार्गदर्शन करतांना**



**कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी**

## विज्ञान मंडळ आणि मराठी मंडळ — पार्श्वभूमी

रेऊ वाणी विज्ञान विहारा तर्फे एकूण १० शाळांमध्ये विज्ञान मंडळ आणि मराठी मंडळ यांची स्थापना करण्यात आली आहे. या दोन्ही मंडळांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. मराठी मंडळ. मराठी मंडळाच्या स्थापनेचा प्रमुख उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबद्दल गोडी निर्माण करणे वाचनाची आवड वाढविणे आणि सर्जनशील लिखाणासाठी प्रेरणा देणे हा आहे.

## विज्ञान मंडळ आणि मराठी मंडळ — उद्दिष्ट

रेऊ वाणी विज्ञान विहारा तर्फे स्थापन करण्यात आलेल्या या दोन्ही मंडळांद्वारे विद्यार्थ्यांचा भाषिक तसेच वैज्ञानिक विकास साध्य होईल. मराठी मंडळातून भाषिक कौशल्याचा विकास तर विज्ञान मंडळातून वैज्ञानिक दृष्टीकोन आणि पर्यावरण-जाणिवा रुजविण्याचे उद्दिष्ट साध्य होईल.

## जागतिक हृदय दिन व विवेकी विचार कार्यक्रम साजरा

**धुळे : रेऊ वाणी विज्ञान विहाराच्या विज्ञान मंडळातर्फे २९ सप्टेंबर रोजी जागतिक हृदय रोग दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी डॉ. संजय संघवी यांनी बदलत्या जीवनशैलीमुळे वाढणाऱ्या हृदयविकारांबाबत माहिती देत, योग्य आहार, व्यायाम, योग व प्राणायामाचे महत्त्व पटवून दिले. यानंतर प्रा. भूषण पाटील यांनी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'विवेकी विचार' या विषयावर मार्गदर्शन करत अंधश्रद्धेविरुद्ध वैज्ञानिक दृष्टीकोन अंगीकारण्याचे आवाहन केले.**

**अध्यक्षीय भाषणात डॉ. के. बी. पाटील यांनी वाचनाची आवड वाढवून विवेकबुद्धी विकसित करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. दीपाली महाजन यांनी केले.**



**विज्ञान मंडळाच्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी मार्गदर्शन करतांना**

## 'ओळख साहित्याची' – मराठी मंडळाचा कार्यक्रम संपन्न

का.स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित रेऊ वाणी विज्ञान विहारातर्फे मराठी मंडळांतर्गत 'ओळख साहित्याची' हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. के. बी. पाटील होते. प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त प्रा. उषा पाटील, डॉ. सौ. सुप्रिया पाटील व सौ. वैशाली सोनगिरे उपस्थित होत्या. कार्यक्रमात प्रा. उषा पाटील यांनी ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त लेखक वि. स. खांडेकर यांच्या साहित्याची ओळख करून देत त्यांच्या लेखनातील जीवनतत्त्वज्ञान आणि माणुसकीवर प्रकाश टाकला. त्यानंतर डॉ. सुप्रिया पाटील यांनी पु. ल. देशपांडे यांच्या विनोदी आणि वास्तववादी लेखनशैलीबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड जोपासून अशा उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, साहित्य माणसाच्या जीवनाला दिशा देते असे सांगत कार्यक्रमाचा समारोप केला.



**मराठी मंडळाच्या कार्यक्रमात उपस्थित मान्यवर**

## शाडू मातीचा इको-फ्रेंडली गणपती बनवण्याची कार्यशाळा संपन्न

पर्यावरण पूरक समिती अंतर्गत दरवर्षीप्रमाणे यंदाही शाळेत शाडू मातीचा इको-फ्रेंडली गणपती बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. ही कार्यशाळा दिनांक 23 व 24 ऑगस्ट 2025 रोजी घेण्यात आली. सदर कार्यशाळेत विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक गणपती मूर्ती तयार करण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी शाडू मातीचा वापर करून मूर्ती बनविल्यास पर्यावरणावर होणारा अपाय टाळता येतो, हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून दाखविण्यात आले.

या कार्यशाळेत एकूण 40 विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सौ. वैशाली सोनगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेने व कौशल्याने सुंदर व आकर्षक गणपती मूर्ती तयार केल्या.






## ‘वयात येताना’ या विषयावर कार्यशाळा संपन्न

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालयाच्या महिला कक्षाच्यावतीने बी.एस.डब्ल्यू. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी “वयात येताना” या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा शनिवार, दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात संपन्न झाली.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना वयात येताना होणारे ‘शारीरिक व मानसिक बदल’ तसेच ‘ताणतणाव व्यवस्थापन’ या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. दिपाली महाजन व सौ. वैशाली सोनगिरे यांनी आपले मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत किशोरवयीन काळातील बदल समजून घेण्याचे, सकारात्मक दृष्टीकोन ठेवण्याचे व मानसिक आरोग्य जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे आयोजन महिला कक्षाच्यावतीने करण्यात आले असून, विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. कार्यशाळेच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान प्रश्न उत्तर स्वरुपात घेण्यात आले आणि अशाप्रकारे सदर कार्यशाळेद्वारे “वयात येताना” विविध समस्या बाबत विस्तृत चर्चा कार्यशाळेमध्ये झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोशनी चौरे या विद्यार्थिनीने केले तसेच आभार प्रदर्शन शीतल बागुल या विद्यार्थिनीने केले.





मार्गदर्शन करतांना डॉ. दिपाली महाजन व सौ. वैशाली सोनगिरे

# बालनेत्र सुरक्षा प्रकल्प

उन्हाळी सुटीनंतर बालनेत्र सुरक्षा प्रकल्पाचे काम परत जोमाने सुरु झाले आहे. जुलै ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत धुळे व साक्री तालुक्यातील ५३ गावातील ११८ शाळांमध्ये १९३०८ विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान ६८६ विद्यार्थ्यांना रेफर करण्यात आले व १८२ विद्यार्थ्यांना तिरळेपणा असल्याचे निदर्शनास आले. रेफर केलेल्या विद्यार्थ्यांपैकी ७५ विद्यार्थी शारदा नेत्रालायात येवून गेले. शस्त्रक्रिया सुचविलेल्या सात विद्यार्थ्यांपैकी चार विद्यार्थ्यांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली.



गाडीत तपासणी करतांना



शाळेत तपासणी करताना समुपदेशक

नेत्र तपासणी दरम्यान शारदा नेत्रालयात धुळे तालुक्यातील रेफर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांपैकी ७ विद्यार्थ्यांना शस्त्रक्रिया सुचविण्यात आली. त्यापैकी रीना विलास महाले (बुरझड), वर्षा नानाभाऊ पाटील (निकुंभे), जानवी मनोहर मोरे (बिलाडी), हर्षल रविंद्र वळवी (बोरविहीर) या चार विद्यार्थ्यांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली.



शस्त्रक्रिये पूर्वी | शस्त्रक्रिये नंतर | शस्त्रक्रिये पूर्वी | शस्त्रक्रिये नंतर | शस्त्रक्रिये पूर्वी | शस्त्रक्रिये नंतर

दिनांक १०.७.२०२५ रोजी श्री स्वामी समर्थ केंद्र विद्या नगर व ए. बी. फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुपोर्णिमा निमित् आरोग्य शिबीर अंतर्गत ४८ (३९ जेष्ठ नागरिक व ९ मुले) यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान १५ (१४ जेष्ठ नागरिक व १ शालेय ) यांना रेफर करण्यात आले व ७ जेष्ठ नागरिकांना चष्मा नंबर काढून देण्यात आला.




श्री स्वामी समर्थ केंद्र विद्या नगर व ए. बी. फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुपोर्णिमा निमित्त आरोग्य शिबीर मध्ये नेत्र तपासणी करतांना.

दिनांक ३१.७.२०२५ रोजी धमाणे येथील अस्थिव्यंग व वृद्धाश्रम येथील निवासी विद्यार्थी व वृद्धांची नेत्र तपासणी करण्यात आली. अस्थिव्यंग शाळेतील १८ मुले व १० मुली असे एकूण २८ जणांची नेत्रतपासणी करण्यात आली तपासणी दरम्यान ४ विद्यार्थ्यांना रेफर करण्यात आले. तसेच वृद्धाश्रमातील एकूण १२ जेष्ठ नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान ८ जणांना रेफर करण्यात आले.



अस्थिव्यंग शाळेत विद्यार्थ्यांची तपासणी करताना



धमाणे येथे जेष्ठ नागरिकांची तपासणी करतांना

# स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन संस्था, पुणे

## 'मानसिक आजारी व्यक्तींचे हक्क दिवस ' साजरा

६ ऑगस्ट २०२५ रोजी एरवाडी दिवस पाळण्यात आला. हा दिवस 'मानसिक आजारी व्यक्तींचे हक्क दिवस ' म्हणून ओळखला जातो. एरवाडी मध्ये झालेल्या दुर्घटनेमध्ये मृत्यू झालेल्या मानसिक आजारी व्यक्तींच्या स्मरणार्थ, संस्थेमध्ये मेणबत्त्या लावून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. सा चे विश्वस्त श्री. अमृत बक्षी यांनी या दिवसाचे महत्व सांगितले.



## SAA मधील शुभार्थिनींनी आगाखान पॅलेसला भेट

३० ऑगस्ट २०२५ रोजी, पाचव्या शनिवारचे औचित्य साधून SAA मधील शुभार्थिनींनी आगाखान पॅलेसला भेट दिली. तेथे असलेल्या कस्तुरबा खादी ग्रामोद्योग विद्यालयाला देखील त्यांनी भेट दिली. विद्यालयाच्या मुख्याध्यापिकांनी प्रशिक्षण कार्यक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिली तसेच मुखवास कसा बनवला जातो याचे प्रात्यक्षिक दाखवले.



## 'केरगिव्हर्स डे' साजरा

१० सप्टेंबर रोजी सा चे संस्थापक डॉ जगन्नाथ वाणी यांच्या जन्मदिवसानिमित्त संस्थेमध्ये 'केरगिव्हर्स डे' साजरा करण्यात आला. डॉ. जगन्नाथ वाणी यांना सा चे अध्यक्ष श्री. अभय केले, विश्वस्त अमृत बक्षी, उपाध्यक्ष प्रगती कौशल, उपाध्यक्ष व खजिनदार नीता कोपरकर यांनी आदरांजली वाहिली. २ सत्रांमध्ये वेबीनार आयोजित करण्यात आले होते. भारतातील विविध संस्थांची माहिती त्यांच्या संस्थापकांतर्फे देण्यात आली होती.



## श्री अमृतकुमार बक्षी यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

'सा' संस्थेचे माजी अध्यक्ष श्री. अमृत कुमार बक्षी यांना ३ आणि ४ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी पॅनेलिस्ट म्हणून आमंत्रित करण्यात आले सा संस्था व का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानसाठी ही गौरवास्पद बाब आहे . या परिषदेत मानसिक आरोग्य आणि वर्तणुकीय विज्ञान यांच्यातील विकसित होत असलेल्या संबंधांचा शोध घेण्यासाठी विविध क्षेत्रातील आरोग्य व्यावसायिक, सहयोगी आणि आरोग्यसेवा व्यावसायिक, संशोधक, धोरणकर्ते, शिक्षक, विद्यार्थी आणि समर्थक यांनी सहभाग घेतला.

ही परिषद सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस (SIHS) आणि सिम्बायोसिस सेंटर फॉर इमोशनल वेलबीइंग (SCEW), सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी (SIU), पुणे, भारतातील घटक संघटक यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानच्या सर्व विश्वस्त, पदाधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने आदरणीय बक्षी काकांचे मनःपूर्वक अभिनंदन!




आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभागी 'सा' संस्थेचे माजी अध्यक्ष श्री. अमृत कुमार बक्षी व ईतर मान्यवर

## मा.श्री. उज्वल केले यांची 'सा' पुणे या संस्थेच्या अध्यक्षपदी निवड



मा. उज्वल केले यांचा सत्कार करतांना
श्री. अभय केले व विश्वस्त मंडळ

'सा' संस्थेचे विश्वस्त व का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेचे माजी विश्वस्त पुणे येथील रहिवासी मा. श्री. उज्वल केले यांची 'सा' पुणे संस्थेच्या अध्यक्षपदी तीन वर्षांसाठी निवड करण्यात आली.

मा. उज्वल केले व्यवसायाने मेकॅनिकल इंजिनिअर असून त्यांनी प्रोजेक्ट मॅनेजमेंट क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीकरिता त्यांनी 100 पेक्षा अधिक प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केलेले आहेत. सेवाभाव, नेतृत्व व समाजाशी नाते हा त्यांचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळेच त्यांनी पुणे विभागातील रोटरीच्या कार्यात एक वेगळाच ठसा उमटविला आहे. मा. उज्वल केले हे सर्वांना घेऊन चालणारे व्यक्तिमत्त्व असून त्यांच्या अनुभवांचा व गुणांचा 'सा' या संस्थेसाठी नक्कीच उपयोग होईल व ही संस्था प्रगतीमध्ये उंच भरारी घेईल. त्यांच्या निवडीबद्दल का.स. वाणी संस्थेचे सर्व विश्वस्त आणि कर्मचारी वृंद यांचेतर्फे हार्दिक अभिनंदन !

## शारदा नेत्रालयातर्फे नेत्र तपासणी सुविधा आता चाळीसगावातही उपलब्ध

का.स. वाणी स्मृती प्रतिष्ठान व संदीप फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या शारदा नेत्रालय, धुळे यांच्यातर्फे जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यात नेत्र तपासणी सुविधा केंद्र ७ सप्टेंबर पासून सुरू करण्यात आले असून या सुविधा केंद्रास उत्तम प्रतिसाद लाभत आहे. चाळीसगाव तालुक्यातील व परिसरातील पाड्यांमध्ये वस्तीस असलेल्या गरजू रुग्णांना या सुविधेचा लाभ होत आहे. ज्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्याची गरज असेल त्या रुग्णांना पुढील उपचारासाठी शारदा नेत्रालय धुळे येथे बोलवण्यात येते. शारदा नेत्रालयातर्फे सुरू केलेल्या या उपक्रमा बद्दल चाळीसगाव व परिसरातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.




मनोगत व्यक्त करतांना संस्थेचे
अध्यक्ष मा.सी.ए.श्री. शशिकांत धामणे

# शारदा नेत्रालय OPD रिपोर्ट

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **SHARDA NETRALAY, DHULE** | | | | | | |
| | (Unit of Sundeep Foundation, Mumbai ) | | | | | | |
| | **PERFORMANCE SUMMARY FROM July -2025 TO Sept 2025** | | | | | | |
| **A** | **Outpatient visits** | | | **B** | **Outpatient visits** | | |
| **1** | **Walk-in Free & Paid** | | | **1** | **Free/Outreach/Paid** | | |
| | New | | 9,315 | | **Free & Outreach** | | |
| | Review | | 6,366 | | Walkin- Free | 594 | |
| | Retina OPD | | 884 | | Outreach (screening eye camps) | 283 | |
| | Pediatrict OPD | | 98 | | Retina | 7 | |
| | Express OPD | | 422 | | Pediatric | 5 | 889 |
| | Review Express OPD | | 259 | | **Paid** | | |
| | Walk-in - Total | | **17,344** | | SICS Paid & Subsidised | 364 | |
| **2** | **Vision Center - Chalisgon** | | | | Phaco | 1,192 | |
| | New | | **251** | | Pediatric | 2 | |
| | Review | | **53** | | Retina | 46 | |
| | Vision Center - Chalisgon Total | | **304** | | Others Surgeries & Procedure | 945 | 2,549 |
| **3** | **Outreach** | | | | **Total** | | **3,438** |
| | Screening eye camps | | 2,387 | | | | |
| | Outpatient visits (walk-in+outreach) - Total | | **20,035** | | | | |

का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठान, धुळे
विद्यमान विस्वस्तांची यादी

संस्थापक : स्व.डॉ.जगन्नाथ काशिनाथ वाणी
सीए.श्री.शशिकांत एस. धामणे (विश्वस्त)
प्रा. डॉ. शोभा प. शिंदे (सचिव)
डॉ. श्री. के. बी. पाटील
श्री. श्रीराम जगन्नाथ वाणी
प्रा. डॉ. श्री. एन.एम.जैन
श्री. श्रीपाल तेजराज मुणोत
श्री. विवेक राघुनाथ केले
श्री. जितेंद्र धर्मराज सोनगिरे

**We accept donations from well-wishers**

K.S.Wani Memorial Trust
IDBI Bank, Dhule (Maharashtra)
Current Account No. 48310010006917
IFSC Code IBKL0000483
---------------------------
K.S. Wani Memorial Trust.
FCRA Reg. No. 083820024
PAN No. AAATK9380K
---------------------------

**Contact:** K. S. Wani Memoral Trust,
Unnati Nager Nakane Road Deopur Dhule- 424002
(02562)223654, 9372810477
Email Id: kswmarathi@gmail.com
Please Visit: www.kswtrust.org

का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था,
विद्यमान विस्वस्तांची यादी

संस्थापक : स्व. डॉ.जगन्नाथ काशिनाथ वाणी
डॉ. श्री. के. बी. पाटील (अध्यक्ष)
प्रा. डॉ. शोभा प. शिंदे (सचिव)
सीए. श्री. शशिकांत एस. धामणे
प्रा. डॉ. श्री. एन.एम.जैन
श्री. श्रीपाल तेजराज मुणोत
श्री. विवेक राघुनाथ केले

